# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 April 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- निवडणूक साहित्यावर मुद्रक आणि प्रकाशकाची माहिती सुस्पष्ट छापण्याची निवडणूक आयोगाची सूचना
- भाजपकडून नऊ उमेदवारांची दहावी यादी जाहीर- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडूनही एकूण नऊ उमेदवारांची घोषणा
- लातूर इथं रस्ता अपघातात इंदूरच्या चार जणांचा मृत्यू

आणि

- रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी

****

निवडणूक साहित्यावर मुद्रक आणि प्रकाशकाची माहिती सुस्पष्ट रुपात छापण्याची सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. निवडणूक प्रचारातल्या जबाबदारीसंदर्भात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीनं तसंच प्रचार खर्चाच्या एकूण हिशेबासाठी ही बाब आवश्यक असल्याचं, आयोगानं म्हटलं आहे. मुद्रक तसंच प्रकाशकाच्या नाव आणि पत्त्याविना प्रचार साहित्य छापण्यास तसंच प्रसिद्ध करण्यास मनाई आहे.

****

लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर येणाऱ्या तक्रारींचं तातडीनं निवारण करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील मतदारांकडून आतापर्यंत १४ हजार ७५३ इतक्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यांपैकी सुमारे ९८ टक्के म्हणजेच १४ हजार ३६८ तक्रारींचं निवारण करण्यात आलं असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. या संकेतस्थळावर तक्रारी नोंदवण्यात

महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून, नागालँड पहिल्या तर गुजरात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं, आयोगानं म्हटलं आहे.

****

लोकसभा निवडणूकीसाठी भारतीय जनता पक्षानं आज चंदीगढ, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधील नऊ उमेदवारांची दहावी यादी जाहीर केली. यामध्ये माजी पंतप्रधान दिवंगत चंद्रशेखर यांचे पुत्र नीरज शेखर यांना उत्तरप्रदेशातल्या बलिया मतदार संघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

****

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज आणखी दोन उमेदवारांची घोषणा केली. सातारा इथून शशिकांत शिंदे यांना, तर रावेर इथून श्रीराम पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या घोषणेसोबतच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष राज्यात लढवत असलेल्या दहा पैकी ९ मतदार संघातल्या उमेदवारांची नावं जाहीर झाली असून, आता फक्त माढ्याचा उमेदवार जाहीर करणं बाकी आहे.

****

यंदाची लोकसभा निवडणूक ही दोन विचार प्रवाहांमधली लढाई असल्याचं मत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी व्यक्त केलं आहे. आज सामाजिक संपर्क माध्यमावरच्या एका संदेशात बोलताना राहुल गांधी यांनी, एका बाजूला काँग्रेसनं भारताला नेहमीच एकसंध ठेवलं तर दुसऱ्या बाजूकडून कायम विभाजन केलं गेल्याचा आरोप केला.

****

पंतप्रधान तथा भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज नागपूर जिल्ह्यातल्या रामटेक इथं प्रचारसभा होत आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे राजू पारवे हे महायुतीचे, तर काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे हे महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. दरम्यान, बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती उत्तर नागपूरमधल्या इंदोरा इथं उद्या जाहीर सभा घेणार आहेत.

****

नांदेडचे महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ, भाजप ज्येष्ठ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची महाराष्ट्रातील पहिली सभा उद्या नांदेडमध्ये होणार आहे. नांदेड जिल्ह्यात नायगाव तालुक्यातील नरसी इथं दुपारी तीन वाजता ही सभा होईल, या सभेचे समन्वयक विश्वास पाठक यांनी ही माहिती दिली.

****

उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या कांदिवली पश्चिम इथल्या निवडणूक प्रचार कार्यालयाचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून गेल्या १० वर्षात मुंबईचा चेहरा-मोहरा बदलला आहे. विविध प्रकारच्या प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईचा विकास होत असल्याचं फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या भूमिकेला पाठींबा दिल्याबदल फडणवीस यांनी राज ठाकरे यांचेही आभार मानले.

****

आगामी निवडणुकीत दिव्यांग आणि वृद्ध मतदारांना घरुनच मतदान करण्याची सोय निवडणूक आयोगानं उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवर असलेल्या महाराजगुडा इथल्या सुरेखा राठोड या ४० वर्षीय दिव्यांग महिलेनं गृह मतदानाची इच्छा व्यक्त केली होती. या गावात एकमेव दिव्यांग असलेल्या सुरेखा यांचं मत नोंदवून घेण्यासाठी एक पथक परवा सोमवारी त्यांच्या घरी दाखल झालं. घरातच स्थापन केलेल्या तात्पुरत्या मतदान कक्षात सुरेखा यांनी मतदान करून मतपत्रिका बंद लिफाफ्यात अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली. या पथकाने सीमेलगतच्या नारपठार या गावातल्या तीन वयोवृद्ध नागरिकांचंही गृहमतदानाद्वारे मत नोंदवून घेतलं.

****

लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण, यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित होमिओपॅथिक परिषदेचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज झालं. "संशोधनाचं सक्षमीकरण, नैपुण्य वाढ" ही या अधिवेशनाची संकल्पना आहे. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात अनुवादात्मक संशोधन, संशोधन आणि सराव, महामारी आणि सार्वजनिक आरोग्य, होमिओपॅथिक औषध मानकीकरण आणि मूलभूत संशोधन, या विषयांवर विविध सत्रं होणार आहेत.

****

जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक कावीळ अहवालानुसार, कावीळ संसर्गामुळे होणाऱ्या मृत्यूत लक्षणीय वाढ झाली आहे. कावीळ संसर्गामुळे जगभरात दर दिवशी सुमारे साडे तीन हजार तर दरवर्षी १० लाखाहून अधिक मृत्यू होत असल्याचं या अहवालात नमूद आहे. या पार्श्वभूमीवर कावीळ प्रतिबंधासाठी ठोस पावलं उचलण्याची गरज जागतिक आरोग्य संघटनेनं व्यक्त केली आहे.

****

ज्येष्ठ पत्रकार प्रमोद माने यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पत्रकारितेसह राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक तसंच सामाजिक क्षेत्रातल्या अनेकांनी माने यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. माने यांचं काल दीर्घ आजाराने हैदराबाद इथं निधन झालं, ते ६१ वर्षांचे होते.

****

लातूर जिल्ह्यात ट्रक आणि कारच्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. उदगीर-निलंगा राज्य महामार्गावर देवणी तालुक्यातील धनेगाव जवळ आज दुपारी ही दुर्घटना घडली. कारमधील मृत चौघे हे मध्यप्रदेशातील इंदूर इथले कापडाचे व्यापारी असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी शहरासह परिसरात काल रात्री झालेल्या वादळी वारा आणि गारपिटीने जटाळवाडी इथल्या एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. देवराव बाभळे असं त्यांचं नाव नाव असून, ते ६५ वर्षांचे होते. कनका इथं गारपिटीमुळे एक गाय अन् चार शेळ्या देखील दगावल्याचं वृत्त आहे. गारपिटीने नुकसान झालेल्या भागाचं सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसीलदार सुरेखा नांदे

यांनी दिल्या आहेत. वसमत तालुक्यातही अवकाळी पावसामुळे केळी पिकाचं मोठं नुकसान झालं आहे.

मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आजपासून पुढील चार दिवस वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही १३ तारखेपर्यंत अशाच पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

****

मुस्लिम धर्मियांचा सण ईद-उल-फित्र, अर्थात रमजान ईद उद्या साजरा होत आहे. या निमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ही ईद सर्वांच्या जीवनात आनंद, उत्तम आरोग्य आणि संपन्नता घेऊन येवो असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, उद्या ईदच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमधून नागरिक गर्दी करत आहेत. कपडे, आभुषणं, गृहसजावटीचं साहित्य तसंच सुक्या मेव्याच्या खरेदीकडे नागरिकांचा अधिक कल दिसून येत आहे.

****

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेकडून मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. याअंतर्गत मनपा प्रियदर्शनी विद्यालयातून जनजागृती फेरी काढण्यात आली, सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी या फेरीतमध्ये सहभाग घेऊन लोकसभा निवडणुकीसाठी औरंगाबाद मतदार संघात १३ मे रोजी मतदान करण्याचा संदेश दिला.

****